डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९–२०/४७७ दि. ११/०१/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
फक्त पुणे व पिंपरी–चिंचवड परिसर.

विषय– राष्ट्रीय मतदार दिन दि. २५ जानेवारी २०२० रोजी, साजरा करण्याबाबत

महोदय,

मा. भारत निवडणूक आयोग, मा. उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार दि. २५ जानेवारी २०२० रोजी, १० वा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येणार आहे. तसेच महाविद्यालयांमध्ये मतदार जागरूकता क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे, यानुसार मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करावी, तसेच खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१. प्रत्येक महाविद्यालयाने स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता क्लब (ELC) अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी युवा मतदार उत्सव साजरा करणे.
२. नव मतदारांना ‘मतदार असल्याचा अभिमान मतदानासाठी सुसज्ज’ (Proud to be a Voter Ready to Vote) हे घोषवाक्य लिहिलेले बॅचेस वितरण करावे.
३. नवीन मतदारांच्या जागृतीसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजित करावा.
४. भवी मतदारांसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजीत करावा.
५. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणे.

सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर उपक्रमाचे फोटो व अहवाल त्वरीत nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर “राष्ट्रीय मतदार दिन २०२०” या विषयासह पाठवण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

# जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) पुणे

**बी विंग, चौथा मजला, पुणे -४११००१**

फोन / फॅक्स नं. ०२०-२६१२३७४४ E-mail - dydeopune१@gmail.com

क्र. पीईई-३/कावि/ ३८/२०१९
पुणे दि.२४/१२/२०१९

**प्रति,**
श्री. प्रभाकर देसाई,
कार्यक्रम समन्वयक,
एन एस एस
पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय - दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.**

संदर्भ - १.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.४९१/ECI/LET/ FUNC /SVEEP-I/NVD/२०१९, दि.१०.१२.२०१९
२.अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.ईएलआर-२०१९/प्र.क्र.१५५७/१९/३३ दि.१९.१२.१९

उपरोक्त संदर्भीय पत्रात मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील सुचनेच्या अनुषंगाने २५ जानेवारी २०२० रोजी १० वा राष्ट्रीय मतदार दिवस (National Voter Day) राज्य, जिल्हा, मतदान केंद्र या स्तरावर साजरा करणेबाबतच्या सुचना देणेत आलेल्या आहेत. यामध्ये यावर्षीच्या १० व्या राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमासाठी आयोगाने " Electoral Literacy for Stronger Democracy" हा विषय (Theme) घोषित केला आहे. १० व्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या विषयाच्या अनुषंगाने महिला, युवक, अपंग व्यक्ती, जेष्ठ नागरिक, सेना दलातील मतदार, अनिवासी भारतीय, तसेच, समाजातील दुर्लक्षीत घटक यांना विचारात घेऊन कृती करावयाची आहे.

प्रत्येक वर्षी दि. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येत आहे. मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचया अनुषंगाने नवतरुण विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी सर्व महाविद्यालयांमध्ये मतदार जागरुकता क्लबची (ELC) स्थापना करण्यात आलेली आहे. व वर्षभर या क्लबच्या माध्यमातून नव तरुण विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणेत येत आहे.

उपरोक्त प्रमाणे जिल्हास्तरावर दि.२५.१.२०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस (१० वा राष्ट्रीय मतदार दिवस) यशस्वीपणे साजरा करण्याच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील आदेश क्र. पीईई-३/कावि/१९४२/१९ दि.३०/१२/२०२० अन्वये जिल्हास्तरीय समिती स्थापन करणेत आलेली आहे सदर समितीमध्ये आपणही सदस्य आहात. तरी १० व्या राष्ट्रीय मतदार दिवसाचे जिल्हास्तरावर यशस्वीपणे आयोजन करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीची दि. ०४-०१-२०२० रोजी बैठक घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीस आपण अनुपस्थित होता, त्यामुळे समिती मध्ये चर्चा झाल्याप्रमाणे आपल्या स्तरावर राष्ट्रीय मतदार दिवसांच्या (NVD) संदर्भात आपण उपजिल्हा निवडणूक

अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात उपस्थित राहून याबाबत सविस्तर नियोजन करावे. व खालील प्रमाणे कार्यक्रम साजरा करण्याबाबत कार्यवाही करावी.

१० व्या राष्ट्रीय मतदार दिवसाचे आयोजन जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी करताना नागरी/ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, नागरी सामाजिक संस्था, एनसीसी, एनएसएस, Scout & Guide या सारख्या युवक स्वयंसेवकांच्या संस्था, माध्यमिक यांच्या साहय्याने करावयाचे आहे. यास्तव आपल्या अधिनस्त असलेल्या एनसीसी, एनएसएस मधील नवतरुण मतदारांना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच, अशा सहभागी होणाऱ्या नव तरुण युवकांच्या नावांची यादी या कार्यालयास दि. १५-०१-२०२० रोजी पर्यंत सादर करावी.

तसेच, पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालयांमध्ये स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता क्लब (ELC) मध्ये दि. २५-०१-२०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश आपल्या मार्फत देण्यात यावेत. निवडणूक साक्षरता क्लब च्या अंतर्गत नवतरुण विद्यार्थ्यांचया सहभागाने विविध खेळांचे व स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे, तसेच पथनाटय, नाटीका, लोकनृत्ये यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करुन भावी व १८ वर्षावरील नवतरुण मतदारांमध्ये मतदान नोंदणी व मतदाना विषयी जनजागरुकता निर्माण करण्यात यावी.

याअनुषंगाने आपलेस्तरावर व महाविद्यालयांच्या स्तरावर आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमाची माहिती, वर्तमान पत्रातील बातम्या व कार्यक्रमाच्या फोटोसह कार्यपूर्तीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

( मृणालिनी सांवत )
**उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे**

# जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) पुणे

**बी विंग, चौथा मजला, पुणे -४११००१**

फोन / फॅक्स नं. ०२०-२६१२३७४४ E-mail - dydeopune१@gmail.com


क्र. पीईई-३/जा.क्र./ ०७ /२०२०
दि.०४/०१/२०२०

## राष्ट्रीय मतदार दिवस २५ जानेवारी २०२० च्या बैठकीचे इतिवृत्त

मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली, सभागृह क्रमांक ०२, ५ वा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे दिनांक ०४/०१/२०२० दुपारी ४.०० वाजता राष्ट्रीय मतदार दिवस २५ जानेवारी २०२० च्या अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकारी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी व राष्ट्रीय मतदार दिवस समितीचे सदस्य यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. तरी सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. प्रविण कोरगंटीवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे
२. श्री. यशवंत मानखेडकर, समन्वयक, नेहरु युवा केंद्र, पुणे
३. श्रीमती अपर्णा मा. शेंडकर, अधिक्षक (वर्ग २), माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे
४. श्री. प्रमोद गायकवाड, मतदार नोंदणी अधिकारी, १९९ दौंड व २०२ पुरंदर विधानसभा मतदार संघ, पुणे
५. श्री. दादासाहेब कांबळे, मतदार नोंदणी अधिकारी, २०० इंदापूर व २०१ बारामती विधानसभा मतदार संघ,
६. श्री. सचिन बारवकर, मतदार नोंदणी अधिकारी २११ खडकवासला विधानसभा मतदार संघ, पुणे
७. श्री. भानुदास गायकवाड, मतदार नोंदणी अधिकारी २१२ पर्वती विधानसभा मतदार संघ, पुणे
८. श्रीमती नीता शिंदे, मतदार नोंदणी अधिकारी २१४ पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघ, पुणे
९. श्री. संतोषकुमार देशमुख, मतदार नोंदणी अधिकारी २१५कसबापेठ विधानसभा मतदार संघ, पुणे
१०. श्रीमती लैला शेख, सहा. मतदार नोंदणी अधिकारी १९८ शिरुर विधानसभा मतदार संघ, पुणे
११. श्री संजय नि. पाटील, सहा. मतदार नोंदणी अधिकारी १९९ दौंड विधानसभा मतदार संघ, पुणे
१२. श्रीमती सोनाली मेटकरी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०० इंदापूर विधानसभा मतदार संघ, पुणे
१३. श्री. विजय पाटील, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०१ बारामती विधानसभा मतदार संघ, पुणे
१४. श्रीमती रुपाली सरनोबत, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०२ पुरंदर विधानसभा मतदार संघ, पुणे
१५. श्री. अजित पाटील, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०३ भोर (भोर) विधानसभा मतदार संघ, पुणे
१६. श्री. शिवाजी शिंदे, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०३ भोर (वेल्हे) विधानसभा मतदार संघ, पुणे
१७. श्रीमती आर. एस. हावळ, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघ, पुणे
१८. श्री. दीपक वजाळे, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०६ पिंपरी विधानसभा मतदार संघ, पुणे
१९. श्री. अमर रसाळ, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २०९ शिवाजीनगर विधानसभा मतदार संघ, पुणे
२०. श्रीमती दिप्ती रिठे, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २१० कोथरुड विधानसभा मतदार संघ, पुणे

२१. श्रीमती रंजना उबरहंडे, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २१२ पर्वती विधानसभा मतदार संघ, पुणे

२२. श्रीमती स्मिता पवार, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २१३ हडपसर विधानसभा मतदार संघ, पुणे

२३. श्रीमती सुरेखा दिवटे, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २१४ पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघ, पुणे

२४.श्रीमती तृप्ती कोलते पाटील, सहा. मतदार नोंदणी अधिकारी २१५ कसबापेठ विधानसभा मतदार संघ, पुणे

२५.श्री. सुरेश पिसाळ, निवडणूक नायब तहसिलदार, २०७ भोसरी विधानसभा मतदार संघ, पुणे

२६. श्री. अनंत पिसे, निवडणूक नायब तहसिलदार, २१० कोथरुड विधानसभा मतदार संघ, पुणे

२७.श्रीमती सुदेशा कांबळे, निवडणूक नायब तहसिलदार, २१४ पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघ, पुणे

२८.श्री. के. अे. थोरात/फणसे, निवडणूक नायब तहसिलदार, २०९ शिवाजीनगर विधानसभा मतदार संघ, पुणे

२९. श्रीमती रोहिणी घाडगे, निवडणूक नायब तहसिलदार, २१३ हडपसर विधानसभा मतदार संघ, पुणे

३०. श्रीमती रेखा जगताप, निवडणूक नायब तहसिलदार, २०३ मुळशी विधानसभा मतदार संघ, पुणे

३१. श्री. रंगराव कांबळे, निवडणूक नायब तहसिलदार, २०४ मावळ विधानसभा मतदार संघ, पुणे

३२. श्री. अविनाश कांबळे, निवडणूक नायब तहसिलदार, २१२ पर्वती विधानसभा मतदार संघ, पुणे

३३. श्रीमती आर. एस. मोरे, मेडीकल सोशल वर्कर, समाज कल्याण जिल्हा परिषद, पुणे

३४.श्री. गणेश फुंदे, माहिती सहाय्यक, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, पुणे

मा. भारत निवडणूक आयोगा यांच्या सूचनेप्रमाणे २५ जानेवारी २०२० रोजी १० राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येणार असून मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील १९ डिसेंबर २०१९ च्या पत्रात दिलेल्या सूचनाप्रमाणे जिल्हयात राष्ट्रीय मतदार दिवस विविध स्तरावर साजरा करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली असून सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य समितीमध्ये असल्याची माहिती देण्यात आली आहे.

१.जिल्हाधिकारी, पुणे - अध्यक्ष,

२.उपायुक्त अपंग कल्याण - सदस्य

३. उपसंचालक, शिक्षण विभाग, पुणे विभाग, पुणे - सदस्य

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण, जि. प. पुणे - सदस्य

५. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जि. प. पुणे - सदस्य

६. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि. प. पुणे - सदस्य

७. जिल्हा समन्वयक, नेहरू युवा केंद्र, पुणे - सदस्य

८. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे - सदस्य

९. कार्यक्रम समन्वयक, एनएसएस, पुणे विदयापीठ, पुणे - सदस्य

१०. समन्वयक, गीत व नाटक विभाग, माहिती व प्रसारण, पश्चिम विभाग, पुणे - सदस्य

११. जिल्हा सैनिक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - सदस्य

१२. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे - सदस्य

१३. सर्व मतदार नोंदणी अधिकारी - सदस्य

१३. मतदार नोंदणी अधिकारी, २१२ पर्वती विधानसभा मतदार संघ, पुणे- सदस्य

१४. सर्व सहा. मतदार नोंदणी अधिकारी, सदस्य

१५. प्राचार्य, - सदस्य

१६. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे - सदस्य सचिव

वरील समिती सदस्य यांनी त्यांच्या कार्यक्षेत्र स्तरावर त्यांच्या अधिनस्त यंत्रणेमार्फत राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात यावा व जिल्हास्तरीय कार्यक्रमासाठी समिती अध्यक्ष तथा मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना आवश्यक ते सहकार्य करणे जिल्हास्तरीय कार्यक्रमासाठी नावीन्यपूर्ण कार्यक्रम सूचविणे याबाबत सदर बैठक घेण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आणून १० राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण जिल्हयामध्ये व जिल्हास्तरावर यशस्वीपणे साजरा करण्यास प्रशासनास आवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यासाठी या कार्यक्रमाकरीता विचारात घ्यावयाचे घटक -

१. भावी मतदार व नव मतदार युवक - युवती यांचा सहभाग वाढविणे.

२. महिला मतदार - यांचा सहभाग वाढविणे.

३. दिव्यांग व्यक्ती/मतदार - यांचा सहभाग वाढविणे.

४. ज्येष्ठ नागरिक/मतदार - यांचा सहभाग वाढविणे व मतदानावेळी मतदान कक्षामध्ये मतदान करण्यासाठी स्वंतत्र रांगेची सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब अवगत करणे.

५. सेना दलातील मतदार - जिल्हा सैनिक कार्यालय यांच्या सहकार्याने यांचा सहभाग वाढविणे.

६. अनिवासी भारतीय - यांचा सहभाग वाढविणे.

७. समाजातील दुर्लक्षित घटक - यांचा सहभाग वाढविणे.

१० राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण जिल्हयामध्ये साजरा करण्यासाठी खालील ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

- जिल्हा स्तरावर
- विधानसभा मतदार संघस्तरावर
- मतदान केंद्रस्तरावर चुनाव पाठशाळांच्या सहभागाने (मा. आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार)
- शाळा व महाविदयालयांमध्ये स्थापन केलेल्या मतदार साक्षरता क्लब (ELC) मध्ये
- सर्व शासकीय, निमशासकिय कार्यालयांमध्ये स्थापन केलेल्या मतदार जागरुकता मंच स्तरावर
- १५ जानेवारी रोजी आर्मी दिवसाचे औचित्य साधून सैनिक दलांतील कर्मचाऱ्यांसाठी
- दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग शाळा, स्वंयसेवी संस्था या ठिकाणी
- महिलांसाठी महिला मंच, बचत गट, महिला कॉलेज, अंगणवाडी सेविका

जिल्हा स्तरावर राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यासाठी सूचना देण्यात आल्या.

- जिल्हास्तरावर दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी साजरा करण्यात येणारा १० वा राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम हा २१२ पर्वती विधानसभा मतदार संघाच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणार आहे. त्यांनी त्याच्या मतदार संघांतर्गत एखादया कॉलेजची निवड करुन सदर कॉलेज च्या विदयार्थ्यांना सदर कार्यक्रमामध्ये सहभागी करुन घेण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यक्रम कोणत्या ठिकाणी घेण्यात यावे याबाबतचे ठिकाण सूचवावे. जिल्हा स्तरीय कार्यक्रम यशस्वीपणे साजरा करण्यासाठी उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाशी सतत संपर्क करुन विविध कार्यक्रमाचे नियोजन करावे.
- या कार्यक्रमामध्ये जिल्हास्तरावर नागरी/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षिणक संस्था, नागरी सामाजिक संस्था, माध्यमिक संस्था, एनसीसी, एनएसएस, Scoute & Guides यासारख्या युवक स्वंयसेवकांच्या संस्था, माध्यमिक संस्था यांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे.
- महाविद्यालय स्तरावर मतदार साक्षरता क्लबद्वारे या मोहिमेमध्ये ज्या नविन तरुण मतदारांची नोंदणी झालेली आहे. त्यांचे मतदार ओळखपत्र व बॅचेस विधानसभा मतदार संघ कार्यालयाच्या मदतीने वाटप करण्याची कार्यवाही सदर कार्यक्रमामध्ये करावयाचे आहे.
- या वर्षामध्ये महाविद्यालय व शालेय स्तरावर स्थापन केलेल्या ज्या मतदार साक्षरता क्लबने जास्तीत जास्त मतदार नोंदणी केलेली आहे. व चांगल्या प्रकारे जनजागरुकता कार्यक्रम आयोजित केलेले आहे. अशा महाविदयालयांस पारितोषिक देण्यासाठी त्यांची माहिती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांच्या केलेल्या कामाच्या तपशीलासह व फोटो अल्बमसह शिफारास या कार्यालयास दिनांक १५/०१/२०२० पर्यंत या कार्यालयास कळवावी.

विविध स्तरावर राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यासाठी खालीलप्रमाणे सहभाग नोंदविण्यासाठी समिती सदस्यांना माहिती देण्यात आली.

१. मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिकारी व सहा. मतदार नोदंणी अधिकारी यांनी मतदार संघातील ज्या ठिकाणी जास्तीत जास्त नवीन मतदार नोंदणी झालेली आहे अशा मतदान केंद्राच्या कार्यक्रमांत सहभाग घ्यावा.
२. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनी नवीन मतदारांना भारत निवडणूक आयोगाने मतदार असल्याचा अभिमान - मतदानासाठी सज्ज (Proud to be Voter - Ready to Vote) हे घोषवाक्य लिहिलेले बॅचेस वितरित करावयाचे आहे.
३. सर्व मतदान केंदस्तरावर चुनाव पाठशाळेच्या सहभागाने राष्ट्रीय मतदार दिवसाचे आयोजन करावे.
४. EVM - VVPAT बाबतची चित्रफित या कार्यक्रमामध्ये दाखविण्यात यावी.

५. सद्यस्थितीत सुरु असलेल्या मतदार पडताळणी कार्यक्रमाची (EVP) माहिती मतारांना देण्यात यावी.

६. जास्तीत जास्त मतदारांना स्वतःची मतदार पडताळणी ऑनलाईन प्रणालीद्वारे करणेकामी प्रोत्साहित करावे तसेच, Hybrid BLO App द्वारे जास्तीत जास्त मतदारांची मतदार पडताळणी मार्फत करावी.

**अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे -**

१. पुणे जिल्हयातील दिव्यांगाची लोकसंख्या १९६८३८ इतकी आहे.

२. त्यापैकी ६७२७९ दिव्यांग मतदारांना चिन्हांकित करण्यात आलेले आहे.

३. तरी जास्तीत जास्त दिव्यांगाची मतदार नोंदणी होण्यासाठी त्यांच्यामध्ये जनजागरुकता निर्माण करावी.

४. यासाठी दिव्यांग संस्था व दिव्यांग शाळा अशा विविध स्तरावर मतदार नोंदणी विशेष मोहिमेचे आयोजन करावे.

५. यासाठी आपलेकडून नाविण्यपुर्ण कार्यक्रम सुचविण्यात यावे व त्याची अमंलबजावणी करण्यात यावी.

६. अशा दिव्यांग संस्थामध्ये दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी १० व्या राष्ट्रीय मतदार दिन साजरा करावा.

**उपसंचालक, शिक्षण विभाग, पुणे विभाग, पुणे व जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, पुणे -**

१. जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये व भावी मतदारांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी शालेयस्तरावर राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाच्या अनुशंगानक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, पुणे यांचेमार्फत सर्व शाळांना सूचना करुन विद्यामध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता करण्यात यावी. शक्य असल्यास प्रभातफेरीचे आयोजन करण्यात यावे.

२. सर्व महाविदयालय व माध्यमिक शाळांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. व त्याबाबतची माहिती संबंधित मतदार संघास देण्यात यावी.

३. तसेच शालेय विद्यार्थी/भावी मतदार विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक विषयक जास्तीत जास्त जनजागरुकता निर्माण करण्यासाठी या दिनाच्या औचित्यांने आपलेकडून नाविण्यपूर्ण कार्यक्रम सुचविण्यात यावे व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**महिला व बाल कल्याण विभाग, पुणे -**

१. महिला मतदारांची जास्तीत जास्त मतदार नोंदणी व्हावी यासाठी महिलांचे कॉलेज, संस्था, महिला मंच, बचत गट अंगणवाडी येथे महिला सहभागाने राष्ट्रीय मतदार दिवसाचा कार्यक्रम आयोजित करावा.

२. महिलांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

३. सद्यस्थितीमध्ये महिलांजवळ Android Mobile असतो त्यांचा उपयोग करुन त्यांनी आपल्या कुंटूबातील सदस्यांची ऑनलाईन पध्दतीने Voter helpline App द्वारे मतदार पडताळणी (EVP) केल्यास राष्ट्रीय

मतदार दिनाच्या औचित्याने महिलांमतदारांमध्ये मतदार जनजागरुकता निर्माण होईल व जास्तीत जास्त मतदारांची मतदार पडताळणी होईल.

**जिल्हा समन्वय, नेहरु युवा केंद्र, पुणे व समन्वयक, गीत व नाटक विभाग, माहिती व प्रसारण, पश्चिम विभाग, पुणे -**

१. राष्ट्रीय मतदार दिवसांच्या कार्यक्रमांमध्ये नव तरुण मतदारांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी नाविण्यपुर्ण कल्पना सूचविणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
२. मतदान केंद्रस्तरावर व जिल्हास्तरावर साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त तरुण युवकांनी सहभाग नोदवून मतदार नोंदणी व मतदार पडताळणी बाबत जनजागरुकता करावी.
३. नेहरु युवा केंद्रांच्या स्वंयसेवकांच्या ग्रुप मार्फत ऑन लाईल पध्दतीने Voter Help line Mobile App द्वारे मतदार पडताळणी कार्यक्रमाची (EVP) प्रसिध्दी करण्यात यावी.

**जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे -**

१. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे यावर्षीच्या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या कार्यक्रमामध्ये जिल्हास्तरावरुन ऑनलाईन खेळ व स्पर्धा आयोजित करावयाच्या आहेत. तरी यासाठी कार्यक्रम समन्वय, एनएसएस, पुणे विद्यापीठ, नेहरु युवा केंद्र व मतदार नोंदणी अधिकारी 212 पर्वती विधानसभा मतदार संघ यांचेशी समन्वय ठेवून क्रिडा कार्यक्रमांचे आयोजन करावे.
२. स्पर्धे मध्ये विजयी झालेल्या विजेत्या स्पर्धेकांची नावे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी या कार्यालयास कळविण्यात यावीत.
३. जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमामध्ये विजेत्यांचा सत्कार करण्यासाठी विजेत्यांची नावे कळविण्यात यावी.

**कार्यक्रम समन्वय, एनएसएस, पुणे विद्यापीठ, पुणे -**

१. जिल्हयातील सर्व महाविद्यालयांअंतर्गत स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता क्लब (ELC) अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी युवा मतदार उत्सव साजरा करणे.
२. नव मतदारांना मतदार असल्याचा अभिमान मतदानासाठी सज्जज (Proud to be a Voter - Ready to Vote) हे घोषवाक्य लिहिलेले बॅचेस वितरण करावे.
३. नवीन मतदारांच्या जागृतीसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजीत करावा.
४. भावी मतदारांसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजीत करावा.
५. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणे.

६. दोन विजेत्या स्पर्धेकांची नावे जिल्हास्तरावरील कार्यक्रमांमध्ये पारितोषिक वितरणासाठी दि.१५-०१-२०२० पर्यंत कळविण्यात यावीत.

**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे -**

१. सैन्य दलातील मतदारांसाठी १५ जानेवारी या आर्मी दिवसाचे औचित्य साधून निवडणूक जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन करुन भारत निवडणूक आयोगाकडील पुरविण्यात आलेल्या मतदार जागरुकता चित्रफित दाखविण्यात यावी.

२. सैन्य दलातील कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय मतदार दिवसांच्या कार्यक्रमात समाविष्ट करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेमार्फत संबंधीत विभागांना सूचना देण्यात येवून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे -**

१. जिल्हयातील सर्व नागरिकांमध्ये निवडणूक विषयक जनजागरुकता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिनाचा व्यापक प्रसार व प्रचार सर्व स्तरातील प्रसार माध्यमाद्वारे करण्याची कार्यवाही जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत करण्यात यावी.

२. राष्ट्रीय मतदार दिनाची जाहिरात दि. २५ जानेवारी या दिवशी सर्व वृत्तपत्रांमध्ये द्यावयाची आहेत तरी त्या दृष्टीने या कार्यालयाकडून प्राप्त झालेली जाहिरात प्रसिध्द करावी.

३. पुढील प्रमाणे मतदार पडताळणी कार्यक्रमाची (EVP) सर्व वृत्तपत्रांमध्ये देण्यात यावी.

१० वा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्ह्यामध्ये यशस्वीपणे राबविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त जिल्हा स्तरीय समिती मध्ये सदस्य असलेले खालील अधिकारी बैठकीस गैरहजर होते. त्यामुळे संबधीत अधिकारी यांच्या सहभागाने राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यासाठी रुपरेषा व नियोजन करता आलेले नाही.

१. उपायुक्त, अपंग कल्याण, पुणे,
२. उपसंचालक, शिक्षण विभाग, पुणे विभाग, पुणे,
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण, जि. प. पुणे,
४. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे,
५. कार्यक्रम समन्वय, एनएसएस, पुणे विद्यापीठ, पुणे, समन्वयक,
६. गीत व नाटक विभाग, माहिती व प्रसारण, पुणे,
७. जिल्हा सैनिक अधिकारी, पुणे

सदर बैठकीस ठरल्याप्रमाणे उपरोक्त अनुपस्थित असलेल्या अधिकारी यांनी उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचेशी पुढील ३-४ दिवसांमध्ये प्रत्यक्ष चर्चा करुन सदर कार्यक्रम संबधित अधिकारी यांच्या सहाकार्याने साजरा करण्यासाठी त्यांचे नियोजन सादर करावे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी त्यांच्या

स्तरावरील जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमासाठी सर्व सदस्यांनी सक्रीय राहून सहभाग नोंदवावा व हा कार्यक्रम यशस्वीपणे साजरा करण्यासाठी सहकार्य करावे असे ठरविण्यात आले.

सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सर्व सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांना उदेशून - दिनांक ०१.०१.२०२० या अर्हता दिनांकावर आधारित विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार पडताळणी कार्यक्रम (EVP) जिल्हयामध्ये खुपच संतगतीने सुरु असून जिल्हयातील एकूण मतदार संख्या ७७,५०,४७८ पैकी केवळ ३,५४,५८२ इतक्या मतदारांची मतदार पडताळणी झालेली आहे. याची टक्केवारी ४.५७% इतकी अल्प आहे. सदर पडताळणी कार्यक्रम विविध स्तरावर यशस्वीपणे करण्यासाठी या कार्यक्रमाची मतदार संघामध्ये जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. मतदारांना ऑनलाईन पध्दतीने व्होटर हेल्पलाईन या मोबाईल ॲपद्वारे मतदार यादीतील स्वतः ची माहिती पडताळणी करुन घेण्याचे आवाहन करण्यात यावे. तसेच प्रत्यक्ष मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे मार्फत BLO App द्वारे कामकाज करावे. शहरी भागामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा याकामी आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्याबाबत मतदर नोंदणी अधिकारी यांनी नोंदविलेली बाब विचारात घेवून लवकरच प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग) पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) यांची जिल्हास्तरावर बैठक घेवून सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी शिक्षक / BLO ची सहकार्य मिळण्यासाठी तातडीने बैठक बोलवण्याचे निश्चित करण्यात आले.

मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर जे BLO या कामी सहकार्य करत नाहीत त्यांचे प्रशासन प्रमुख, गट विकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांच्या बैठका घेवून आवश्यक ते प्रयत्न करण्यात येवून BLO यांना हे काम करण्यासाठी प्रवृत करण्यात यावे. जे BLO अशा कामी सहकार्य करत नाहीत. त्यांची माहिती तातडीन या कार्यालयास सादर करावी. जेणे करुन याबाबत त्यांच्या प्रशासकीय प्रमुख्याकडे ही बाब नमुद करता येईल.

मतदार पडताळणी कार्यक्रम यशस्वीपणे पुर्ण करुन १००टक्के मतदारांची मतदार पडताळणी करण्याबाबत आपण प्रयत्न करण्याबाबत सूचना देण्यात आले.

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**(मृणालिनी सावंत)**
**उप जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**पुणे**

जा.क्र/पीईई-३/कावि/ ०७ /२०१९ दिनांक ०४.०१.२०१९

प्रति,

सर्व संबधित समिती सदस्य -

--------------------------------

प्रत - मतदार नोंदणी अधिकारी,-----------------------

प्रत - सहा. मतदार नोंदणी अधिकारी, ----------------------------------------